# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १४/०७/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मौजा गोंडखैरी येथे **कैलास लिखनलाल बिसेन (मृतक), वय ५५ वर्ष रा. वार्ड नं. ०४, गोंडखैरी पोस्टे कळमेश्वर जिल्हा नागपूर** यांनी दिनांक १२/०७/२०२२ चे सकाळी ०८.३० वा. सुमारास आपल्या राहते घरी नवीन मोटरसायकल गाडी चोरीने गेल्याने व ती परत मिळून न आल्याने त्याबाबतचे टेंशन घेवून घरी ठेवलेले विष स्वता प्राशन केले. त्यामुळे त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचारासाठी मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता डॉक्टरांनी दिनांक १२/०७/२२ चे सकाळी १०.३० वा. तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार राजेश माकडे मेडीकल पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सुभाष राठोड मो नं ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत महार तलाव रामटेक येथे दिनांक १३/०७/२०२२ चे सकाळी १२.०० वा. सुमारास **अक्षय मुकुदंराव मेश्राम(मृतक), वय २३ वर्ष रा. कांदी माईन्स** व त्याचा मित्र हे शौचास महार तलाव रामटेक येथे गेले होते. मृतक हा हात पाय धुण्याकरीता तलावाचे काठावर गेला असता त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने पाय घसरून तलावाच्या पाण्यात बुडुन मरण पावला असावा. तसेच मृतक हा दारू पिण्याचे सवयीचा असून त्याचा मरणास कोणावरही संशय नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनोहर सुभाष मेश्राम वय ५१ वर्ष रा. कांद्री माईन्स यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास मपोउपनि बेंद्रे या करीत आहे.

३) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील चिखली डॅम्प येथे दिनांक १३/०७/२०२२ चे ०८.४५ वा. सुमारास **मोहम्मद अनवर मोहम्मद हारून अंसारी (मृतक), वय ४४ वर्ष, रा. टेका नविन वस्ती आझाद नगर, मक्का मशजीद जवळ, नागपुर** हा त्याचा मित्र जावेद अब्दुल करीम कुरेशी वय ३६ वर्ष, रा. वनदेवीनगर वांजरा ले आउट शिवमंदीर याचे सोबत मच्छी पकडण्यास गेला असता डॅम्पचे पाणी अचानक वाढल्याने पायदळ जात असता अचानक पाय घसरला व पाण्यात पडला. त्याला पोहता येत नसल्यामुळे पाण्यात पडुन डुबुन मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जावेद अब्दुल करीम कुरेशी वय ३६ वर्ष, रा. वनदेवीनगर वांजरा ले आउट शिवमदीर जवळ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनी श्री कोलते हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर